मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | गुरुवार, दि. 12 मार्च 2026 | पान- 1

# अन्यथा शहरातील आरएमसी प्लांट होणार सील....

## शहरातील 75 आरएमसी प्लांटची महापालिकेकडून तपासणी; प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना न केल्यास कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत असून एक्यूआय खराब श्रेणीत दिसून येत आहे. शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. त्यानुसार, नागरीवस्त्यांच्या मध्यभागी सुरु असलेल्या रेडी मिक्स कॉक्रींट (आरएमसी), बांधकाम साहित्याची साठवूण व पुरवठा करणाऱ्या ठिकाणी वायू प्रदूषण नियंत्रणास प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत नाही. त्यामुळे नियमाबाह्य आरएमसी प्लांट हे तत्काळ बंद करण्याचा निर्णय महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून घेण्यात आला आहे.




शहरात मोशी, च-होली, चिखली, डुडूळगाव, ताथवडे, पुनावळे, वाकड आणि रावेत, किवळे यासह अन्य भागात मोठ-मोठे बांधकाम प्रकल्प विकसित होत आहेत. त्यासाठी लागणारे आरएमसी प्लांट मुळात लोकवस्तीच्या बाहेर, औद्योगिक किंवा नियोजित क्षेत्रात असणे अपेक्षित असते. मात्र, हे प्लांट येथील रहिवासी भागात सुरू आहेत. ते चालवण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांकडून पर्यावरण नियम, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निकष आणि महापालिकेच्या अटी-शर्ती धुडकावून लावल्या जात आहेत. धूळ नियंत्रणासाठी आवश्यक पाण्याची फवारणी, बंदिस्त यंत्रणा, हरित पट्टा यांसारख्या उपाययोजना केल्या जात नाहीत.

अनेक भागात लोकवस्तीच्या मध्यभागी आरएमसी प्लांटमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या प्लांटमधून सातत्याने उडणारी धूळ, सिमेंटचे सूक्ष्म कण आणि वाहनांची वर्दळ यामुळे संपूर्ण परिसरात प्रदूषणात मोठी भर पडत आहे. परिणामी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि श्वसनविकार असलेल्या रुग्णांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.

याबाबत नागरिकांनी आरएमसी प्लांटबाबत वारंवार तक्रारी करूनही महापालिकेकडून ठोस कारवाई केली जात नाही. तक्रारी केल्यानंतर काही दिवस किरकोळ उपाययोजना केल्या जातात. मात्र, पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. महापालिकेची ही उदासीन भूमिका बांधकाम व्यावसायिकांना पाठीशी घालणारी असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

### आरएमसी प्लांटची तपासणी सुरु

» शहरातील हवेची गुणवत्ता चांगली राहण्यासह हवा स्वच्छ व पोषक राहील. याकरिता महापालिकेकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहे. वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेकडून वायू गूणवत्ता सुचकांक उपकरणे बसविली आहेत, तर शहरात मुख्य रस्त्यांवर निर्माण होणारे प्रदूषण नियंत्रण आणण्यासाठी फॉग कॅनॉन वाहने, रोड वॉशर वाहने व मिस्ट फाउंटन यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. आरएमसी व क्रशर यासारख्या आस्थापनावर महापालिकेकडून उपद्रव शोध पथकाची निर्मिती केलेली आहे. या पथकाकडून दैनंदिन तपासणी सुरु असून आरएमसी प्लांटची तपासणी करण्यात येत आहे.

> “ शहरातील सर्व आरएमसी प्लांटधारक व बांधकाम साहित्य पुरवठादार यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आरएमसी प्रकल्पासाठी नव्याने नियम लागू केले आहेत. त्या नियमावलीनुसार आरएमसी प्लांट सुरु ठेवावेत. अन्यथा सर्व आरएमसी प्लांट हे बंद ठेवावेत. नियमाबाह्य प्लांट सुरु ठेवणा-यांचे प्लांट सील करण्यात येईल. यांची नोंद घ्यावी.
>
> - संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पर्यावरण विभाग, महापालिका

# रहाटणीतून अपहरण झालेल्या व्यापाऱ्याची अवघ्या 6 तासात सुखरूप सुटका

## पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, पोलीस उपायुक्त शिवाजी पवार आणि त्यांच्या संपूर्ण पथकाचा व्यापाऱ्यांकडून सत्कार

**पिंपरी | प्रतिनिधी**

रहाटणी परिसरात व्यापाऱ्याचे अपहरण करून ५० लाख रुपयांची खंडणी मागितल्याच्या प्रकरणात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अवघ्या सहा तासांत धाडसी कारवाई करत व्यापाऱ्याची सुरक्षित सुटका केली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे (CP), पोलीस उपायुक्त शिवाजी पवार (DCP) आणि त्यांच्या संपूर्ण पथकाचा व्यापारी वर्गाच्या वतीने सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.



मिळालेल्या माहितीनुसार, रहाटणी भागात पाच जणांनी स्वतःला ‘उत्तर प्रदेश पोलीस’ असल्याचे भासवून एका व्यापाऱ्याचे अपहरण केले आणि त्याच्याकडून ५० लाख रुपयांची खंडणी मागितली. या घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखेने तातडीने तपास सुरू केला. तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा तब्बल १०० किलोमीटरपर्यंत पाठलाग केला.

संगमनेर येथील टोल नाका परिसरात पोलिसांनी आरोपींना वेढा घालत व्यापाऱ्याची अवघ्या सहा तासांत सुरक्षित सुटका केली. या प्रकरणात खंडणीविरोधी पथकाने पाचही आरोपींना अटक केली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

या यशस्वी कारवाईत पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या तत्परता व कर्तव्यदक्षतेबद्दल संबंधित व्यापाऱ्याच्या कुटुंबीयांसह शहरातील व्यापारी वर्गाने पोलिसांचे आभार मानले. यावेळी झालेल्या सत्कार समारंभात नगरसेवक हिरानंद उर्फ डब्बू शेठ आसवाणी, सुरेश जेसवाणी, विजय रामनानी, डॉ. कृष्णन वीरवाणी, सुनील केसवाणी, राज कुमार, घनश्याम ललवाणी, महेंद्र पाणीवाणी, झामन दास, श्रीचंद मंधान, सनी गोविया आदी व्यापारी उपस्थित होते.

# थेरगावात उभारणार 100 खाटांचे कर्करोग रुग्णालय

## संबंधित ठेकेदाराला कार्यारंभ आदेश दिला असून दोन वर्षांत इमारत बांधून, प्रत्यक्ष रुग्णसेवा सुरु केली जाणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात दररोज वाढणारे कर्करोगाचे (कॅन्सर) रुग्ण, त्यावरील उपचारांसाठी येणारा लाखो रुपयांचा खर्च, सामान्यांना खासगी रुग्णालयांचे न परवडणारे दर अशा परिस्थितीत गेल्या अनेक वर्षापासून मागणी असलेल्या कर्करोग रुग्णालय उभारणीला अखेर प्रारंभ झाला आहे. महापालिकेच्या वतीने शहरातील कर्करोगग्रस्त रुग्णांना अल्प दरात उपचार मिळावेत यासाठी सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर थेरगावात कर्करोग रुग्णालय उभारले जात आहे. संबंधित ठेकेदाराला कार्यारंभ आदेश दिला असून दोन वर्षांत इमारत बांधून, प्रत्यक्ष रुग्णसेवा सुरु केली जाणार आहे.

थेरगाव येथील महापालिकेच्या थेरगाव रुग्णालयाशेजारी असलेल्या ३५ गुंठे जागेत ११ मजली १०० खाटांचे सुसज्ज कर्करोग रुग्णालय होणार आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारीतून डिझाईन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट (डीबीएफओटी) तत्त्वावर अत्याधुनिक रुग्णालय उभारले जाणार आहे. महापालिकेचे कर्करोगाचे पहिले रुग्णालय असणार आहे. रुग्णालयासाठी १२ मार्च २०२४ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, या निविदा प्रक्रियेस प्रतिसाद मिळाला नाही.

महापालिकेच्या वतीने शहरातील कर्करोगग्रस्त रुग्णांना अल्प दरात उपचार मिळावेत यासाठी सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर थेरगावात कर्करोग रुग्णालय उभारले जात आहे. संबंधित ठेकेदाराला कार्यारंभ आदेश दिला असून दोन वर्षांत इमारत बांधून, प्रत्यक्ष रुग्णसेवा सुरू केली जाणार आहे. निविदेला तीन वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही एकच ठेकेदार सहभागी झाला. त्यामुळे या ठेकेदाराला काम देण्याचे १५ डिसेंबर २०२५ रोजी निश्चित करण्यात आले. त्यानुसार करारनामा करून ठेकेदाराला कार्यारंभ आदेश दिला आहे. कर्करोग रुग्णालय उभारणीसाठी ठेकेदाराला कार्यारंभ आदेश दिला आहे. दोन वर्षांत इमारतीचे काम पूर्ण करून रुग्णालय सुरू करण्यात येईल. रुग्णांना अल्पदरात उपचार दिले जाणार आहेत, असे महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.




### महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेचे दर

**» महापालिकेने आरोग्य सुविधांचे दर निश्चित केले आहेत. महात्मा ज्योतिबा जनआरोग्य योजना तसेच, केंद्र सरकारच्या आरोग्य योजनेतील दराप्रमाणेच शुल्क आकारले जाणार आहे. त्यामुळे रुग्णांना अल्पदरात उपचार मिळणार आहेत. कर्करोग रुग्णालय उभारणीसाठी ठेकेदाराला कार्यारंभ आदेश दिला आहे. दोन वर्षांत इमारतीचे काम पूर्ण करून रुग्णालय सुरू करण्यात येईल. रुग्णांना अल्पदरात उपचार दिले जाणार आहेत, असे महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.**

### अत्याधुनिक सुविधा

**» शहरातील कर्करोगग्रस्तांना एकाच छताखाली सर्व सेवा यामुळे पुरवल्या जाणार आहेत. नागरिकांना उपचारासाठी शहराबाहेर जाण्याची आवश्यकता भासणार नाही. केमोथेरपी, रेडिएशन थेरपी आणि शस्त्रक्रिया यांसारख्या सामान्य कर्करोगाच्या उपचारांव्यतिरिक्त, रुग्णालय समुपदेशन आणि पुनर्वसन यांसारख्या सहायक सेवाही या रुग्णालयात पुरविण्यात येणार आहेत. हे रुग्णालय स्तन, फुफ्फुस, कोलोरेक्टल, प्रोस्टेट आणि गर्भाशय मुखाच्या कर्करोगासह विविध प्रकारच्या कर्करोगाची पूर्तता करण्यासाठी सुसज्ज असणार आहे. रुग्णालयामध्ये लिनियर एक्सीलरेटर्स, ब्रेकीथेरपी युनिट्स आणि पीईटी-सीटी स्कॅनरची सुविधाही दिली जाणार आहे.**

### ठेकेदार चालविणार रुग्णालय

**» संबंधित ठेकेदाराकडून इमारतीचे बांधकाम दोन वर्षांत पूर्ण केले जाणार आहे. महापालिका तफावत निधी (व्हॅबिलिटी गॅप फंड) म्हणून ठेकेदाराला ६० कोटी सहा लाख रुपये चार टप्प्यांत देणार आहे. प्रकल्पाचा एकूण खर्च १४३ कोटी रुपये इतका आहे. उर्वरित खर्च ठेकेदार स्वत: करणार आहे.**

---

# महापारेषणच्या उच्च क्षमतेच्या टॉवर लाईनखाली उंच 'पाम' झाडांची लागवड..

## महाराष्ट्र राज्य विद्युत सनियंत्रण समिती सदस्य संतोष सौंदणकरांच धक्कादायक निरीक्षण..

**पिंपरी | प्रतिनिधी**

बिजलीनगर उड्डाणपूल ते भक्ती शक्ती उड्डाणपूल दरम्यान महावितरणच्या उच्च क्षमतेच्या टॉवर लाईनखाली उंच पाम झाडांची लागवड करण्यात आल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत सनियंत्रण समितीचे पुणे जिल्हा सदस्य तथा शिवसेना पुणे जिल्हा संघटक संतोष रमाकांत सौंदणकर यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे नुकतीच केली आहे.

याबाबत सौंदणकर यांनी आयुक्तांना निवेदन दिले आहे. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बिजलीनगर उड्डाणपूल ते भक्ती शक्ती उड्डाणपूल दरम्यान महावितरणची उच्च क्षमतेची टॉवर लाईन गेली आहे. मात्र याच लाईनखाली महापालिकेच्या वतीने पाम ट्रीसारखी उंच वाढणारी झाडे लावण्यात आली आहेत. भविष्यात झाडांची वाढ झाल्यास ती टॉवर लाईनला अडथळा निर्माण करू शकतात. अशा परिस्थितीत सुरक्षेच्या कारणास्तव महापारेषणकडून झाडे तोडण्याच्या सूचना दिल्या जाऊ शकतात.

महापालिकेने मोठ्या खर्चाने लावलेली झाडे पुन्हा तोडावी लागल्यास सार्वजनिक निधीचा अपव्यय होण्याची शक्यता आहे.



> **व्यावसायिक सिलिंडरचा दर 1650 वरून तब्बल 2800 रुपयांवर गेला, तरीही तो आम्ही वापरत आहोत. मात्र, आता त्याचाही पुरवठा पूर्णपणे बंद झाल्याने हॉटेल व्यवसाय बंद करावा लागण्याची वेळ आली आहे. कारण, आपल्याकडे 175 ग्राहक बसतील इतके मोठे रेस्टॉरंट आहे. एकूण 43 जणांचा स्टाफ आहे. रेस्टॉरंट बंद ठेवले तरी कर्मचारी बाहेरच्या गावांतून, राज्यांतून आलेले आहेत. त्यांचे पगार, त्यांना जेवण द्यावे लागणार आहे. आता त्यांचे जेवण चुलीवर बनविण्याची वेळ आली आहे.**
>
> **- मा. संतोष सौंदणकर, महाराष्ट्र राज्य विद्युत सनियंत्रण समिती, पुणे जिल्हा - सदस्य तथा शिवसेना, पुणे जिल्हा संघटक**

तसेच टॉवर लाईनखाली झाडे असल्यास ती तोडताना अपघात किंवा जीवितहानी होण्याचाही धोका असल्याचे सौंदणकर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

याशिवाय सुशोभीकरणासाठी कमी उंचीची झाडे लावणे अपेक्षित असताना उंच वाढणाऱ्या झाडांची लागवड का करण्यात आली, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या प्रकरणात महापालिकेच्या उद्यान विभागामार्फत ठेकेदारांना लाभ देण्याचा प्रकार झाला आहे का, याचीही चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# पुणे महापालिकेच्या जुन्या सभागृहाचे होणार अत्याधुनिक नूतनीकरण

## 2.22 कोटींचा प्रस्ताव मंजूर; 150 जणांसाठी आधुनिक बैठक व्यवस्था व डिजिटल सुविधा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीतील जुन्या सर्वसाधारण सभागृहाचे लवकरच नूतनीकरण करण्यात येणार असून, या सभागृहाला आधुनिक आणि अत्याधुनिक स्वरूप देण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. या ठिकाणी सुसज्ज आणि अद्ययावत बैठक कक्ष उभारण्यात येणार असून, त्यासाठी सुमारे 2.22 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या प्रस्तावाला महापालिकेच्या पूर्वगणनपत्रक समितीने मंगळवारी (दि. 10) झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

नव्या प्रशासकीय इमारतीत भव्य सर्वसाधारण सभागृह उभारल्यानंतर या जुन्या सभागृहाचा वापर प्रामुख्याने लहान कार्यक्रम, बैठक आणि विविध उपक्रमांसाठी केला जात होता. मात्र, वाढत्या प्रशासकीय कामकाजामुळे मोठ्या आणि सुसज्ज बैठक कक्षाची गरज भासत असल्याने या सभागृहाचे नूतनीकरण करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. नूतनीकरणानंतर या सभागृहात 135 ते 150 व्यक्ती बसू शकतील अशी बैठक व्यवस्था केली जाणार आहे. यामध्ये मोठ्या आकाराचे यू-आकाराचे टेबल, आरामदायी खुर्च्या, प्रत्येक आसनासाठी मायक्रोफोन, प्रोजेक्टर स्क्रीन आणि अन्य डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे बैठका अधिक परिणामकारक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम पद्धतीने पार पाडता येणार आहेत.

जुन्या इमारतीतील या सभागृहाला ऐतिहासिक महत्त्वही लाभले आहे. महापालिकेच्या अनेक महत्त्वाच्या निर्णयांची साक्षीदार असलेल्या या सभागृहाला नव्या स्वरूपात पुनरुज्जीवन देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे. नूतनीकरण पूर्ण झाल्यानंतर येथे महापालिकेच्या महत्त्वाच्या धोरणात्मक बैठका, प्रशासकीय चर्चा तसेच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदांचे आयोजन करण्यासही सुविधा उपलब्ध होणार आहे.



### २.२२ कोटींचा नूतनीकरण प्रकल्प

» पुणे महानगरपालिका मुख्य इमारतीतील जुन्या सर्वसाधारण सभागृहाचे नूतनीकरण करण्यासाठी सुमारे २.२२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या प्रस्तावाला महापालिकेच्या पूर्वगणनपत्रक समितीने मंजुरी दिली आहे. प्रशासकीय बैठका अधिक प्रभावी आणि सुसज्ज वातावरणात पार पाडण्यासाठी हे काम हाती घेण्यात येत आहे. नूतनीकरणामध्ये आधुनिक बैठक व्यवस्था, डिजिटल तंत्रज्ञान आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. काम पूर्ण झाल्यानंतर हे सभागृह महापालिकेच्या महत्त्वाच्या बैठका, प्रशासकीय चर्चा तसेच विविध परिषदांसाठी वापरले जाणार आहे.

### १५० जणांसाठी आधुनिक बैठक व्यवस्था

» नूतनीकरणानंतर या सभागृहात सुमारे १३५ ते १५० व्यक्ती बसू शकतील अशी बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. यामध्ये मोठ्या आकाराचे यू-आकाराचे टेबल, आरामदायी खुर्च्या, प्रत्येक आसनासाठी मायक्रोफोन, प्रोजेक्टर स्क्रीन आणि आधुनिक डिजिटल सुविधा उपलब्ध असतील. त्यामुळे बैठका अधिक परिणामकारक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम पद्धतीने घेता येतील. तसेच सादरीकरणे, धोरणात्मक चर्चा आणि प्रशासकीय नियोजनासाठीही हे सभागृह अत्याधुनिक पद्धतीने सुसज्ज केले जाणार आहे.

### ऐतिहासिक सभागृहाला नवे रूप

» महापालिकेच्या जुन्या इमारतीतील हे सभागृह अनेक महत्त्वाच्या निर्णयांचे साक्षीदार राहिले आहे. शहराच्या प्रशासनिक इतिहासात या सभागृहाला विशेष स्थान आहे. नूतनीकरणाद्वारे या ऐतिहासिक सभागृहाला आधुनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे. काम पूर्ण झाल्यानंतर येथे महत्त्वाच्या प्रशासकीय बैठका, धोरणात्मक चर्चा, तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदांचे आयोजन करण्यासाठीही सुविधा उपलब्ध होणार आहेत.

# 'बालगंधर्व रंगमंदिर'चा या वर्षी पुनर्विकास होणारच!

## आधुनिक सुविधा असलेली तीन प्रेक्षागृहे उभारणार; वर्षभरात काम पूर्ण करण्याचा महापालिकेचा निर्धार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील प्रमुख नाट्यगृह अशी ओळख असलेल्या बालगंधर्व रंगमंदिराचा पुनर्विकास आणि नूतनीकरण करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात करण्यात आली आहे. १९६८ साली बांधण्यात आलेल्या बालगंधर्व रंगमंदिरात अनेक त्रुटी जाणवण्यास सुरुवात झाली असून, कलाकारांच्या तक्रारीदेखील वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर या वास्तूचा या वर्षी पुनर्विकास करण्याचा संकल्प महापालिका प्रशासनाने सोडला आहे. या वर्षी हा प्रश्न मार्गी लावला जाईल, असे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले.

शहरातील प्रमुख नाट्यगृह असलेल्या बालगंधर्व रंगमंदिराच्या नूतनीकरणाचे काम गेले अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे महापालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष असताना त्यांनी बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकास करण्याचे जाहीर केले होते. मात्र, त्यानंतर त्याला कलाकार, सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तीकडून झालेल्या विरोधामुळे हा प्रकल्प रखडला. मात्र, आता हा प्रकल्प पूर्ण करण्याचा ध्यास महापालिका प्रशासनाने घेतला असून, त्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जात आहेत.

महापालिकेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प मांडताना महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनीदेखील 'बालगंधर्व' बाबत ठोस भूमिका घ्यावी लागणार असल्याचे वक्तव्य केले होते. काळानुसार येथे उपलब्ध असलेल्या सुविधांमध्ये बदल करणे आवश्यक असून, यासाठी यासाठी वेळप्रसंगी कठोर निर्णय घ्यावा लागणार असल्याचे संकेत राम यांनी दिले आहेत.बालगंधर्व रंगमंदिराचा पुनर्विकास आणि नूतनीकरणाचे काम या वर्षीच सुरू करून तातडीने पूर्णत्वास नेण्याचा निर्धार महापालिका प्रशासनाने केला आहे.



### बालगंधर्व रंगमंदिर पुनर्विकास योजना

» बालगंधर्व रंगमंदिर या ऐतिहासिक नाट्यगृहाचा पुनर्विकास करताना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पात सुमारे १ हजार ८०० आसनक्षमता असलेली तीन आधुनिक प्रेक्षागृहे उभारली जाणार आहेत. तसेच अत्याधुनिक रंगमंच, ध्वनी व प्रकाश व्यवस्था, कलाकारांसाठी सुधारित मेकअप रूम आणि ग्रीन रूम, आधुनिक स्वच्छतागृहे, वातानुकूलन व्यवस्था आणि सीसीटीव्ही सुरक्षा प्रणालीचा समावेश असेल. प्रेक्षकांसाठी अधिक पार्किंग सुविधा, पाणीपुरवठा व्यवस्था आणि परिसराचे सुशोभीकरणही करण्यात येणार आहे. या कामामुळे पुण्यातील सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी अधिक आधुनिक आणि सुसज्ज नाट्यगृह उपलब्ध होणार आहे.

# गॅस टंचाईचे संकट; पुण्यात हॉटेल-रेस्टॉरंट बंद होण्याची भीती

## युद्धामुळे कमर्शिअल सिलिंडर पुरवठा विस्कळीत; अनेक हॉटेल्सची किचन बंद पडण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

आखातात भडकलेल्या युद्धामुळे कमर्शिअल गॅसचा पुरवठा बंद करण्यात आला असून, घरगुती वापराच्या सिलिंडरवरही अनेक निर्बंध लादले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांतच शहरातील अनेक हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि खानावळी बंद होतील, अशी परिस्थिती उद्भवू शकते. त्यामुळे विद्यार्थी, परगावाहून येणारे प्रवासी यांच्यासह अनेकांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. सरकारने सिलिंडरचा पुरवठा थेट बंद करण्याऐवजी हॉटेल संघटनांशी चर्चा करून सिलिंडरचे रेशनिंग करणे अपेक्षित होते; मात्र तसे झाले नाही, अशी खंत पुणे रेस्टॉरंट्स अँड हॉटेलिअर्स असोसिएशनचे अध्यक्ष गणेश शेट्टी यांनी व्यक्त केली.

कोरोना काळात रेमडिसिव्हर इंजेक्शनचा जसा काळा बाजार सुरू झाला होता, तसाच काळा बाजार आखाती देशातील युद्धामुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या बाबतीत भारतात सुरू झाला आहे. त्याची झळ थेट पुणे शहरापर्यंत पोहचली असून, 19 किलो व्यावसायिक सिलिंडरची किंमत 1 हजार 650 वरून मंगळवारी थेट 4 हजार 500 रुपयांवर गेल्याचे हॉटेल व्यावसायिकाने सांगितले.

राज्यात मुंबईपाठोपाठ सर्वाधिक रेस्टॉरंट, हॉटेल्स पुणे शहरात आहेत. कारण, पुणे हे विद्येचे माहेरघर असल्याने बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. तसेच, उद्योगनगरीमुळे मोठ्या हॉटेल्सच्या चेनदेखील शहरात आहेत. त्यामुळे बाहेरच्या राज्यांतून मोठ्या प्रमाणावर आचारी व कर्मचाऱ्यांना मोठा रोजगार उपलब्ध होतो. शहरात सुमारे 35 हजार आचारी असून, त्यांच्यावर हॉटेलच्या रेसिपीची भिस्त असते. दररोज छोट्या रेस्टॉरंटला दोन ते तीन व्यावसायिक सिलिंडर (19 किलो) लागतात, तर पंचतारांकित हॉटेलमध्ये दररोज 10 ते 12 सिलिंडरचा पुरवठा होतो. सरकारने सिलिंडरचा पुरवठा बंद करण्याची अधिसूचना काढली. ती काढण्यापूर्वी राज्यातील हॉटेल व्यावसायिक संघटनांशी चर्चा करणे अपेक्षित होते



### गॅस पुरवठा बंद; हॉटेल व्यवसाय अडचणीत

**» शहरात हॉटेलची संख्या सुमारे दहा हजारांवर असून, 1400 व्यावसायिक संघटनेचे सदस्य आहेत. त्यांच्यावर आणीबाणीची परिस्थिती ओढवली आहे. सरकारने सिलिंडरचा पुरवठा बंद करण्याची अधिसूचना काढली. ती काढण्यापूर्वी राज्यातील हॉटेल व्यावसायिक संघटनांशी चर्चा करणे अपेक्षित होते. उडुपी हॉटेलमधील डोसा हा पदार्थ आता बंद करावा लागेल. कारण, डोसा करताना जास्त गॅस खर्च होतो. आता जी थोडी फार हॉटेल सुरू राहतील, त्यांचे मेन्यू आता मर्यादित ठेवावे लागणार आहेत. पुणे रेस्टॉरंट्स अँड हॉटेलिअर्स असोसिएशनने पंतप्रधान, पेट्रोलियममंत्री यांच्यासह सर्व संबंधितांकडे शिष्टमंडळ पाठवून या निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंती केली आहे. आता हॉटेल इंडक्शन शेगडीवर चालवावी लागणार.**

### सिलिंडरचा काळा बाजार सुरू

**» कोरोना काळात रेमडिसिव्हर इंजेक्शनचा जसा काळा बाजार सुरू झाला होता, तसाच काळा बाजार आखाती देशातील युद्धामुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या बाबतीत भारतात सुरू झाला आहे. त्याची झळ थेट पुणे शहरापर्यंत पोहचली असून, 19 किलो व्यावसायिक सिलिंडरची किंमत 1 हजार 650 वरून मंगळवारी थेट 4 हजार 500 रुपयांवर गेल्याचे हॉटेल व्यावसायिकाने सांगितले.**

> **व्यावसायिक सिलिंडरचा दर 1650 वरून तब्बल 2800 रुपयांवर गेला, तरीही तो आम्ही वापरत आहोत. मात्र, आता त्याचाही पुरवठा पूर्णपणे बंद झाल्याने हॉटेल व्यवसाय बंद करावा लागण्याची वेळ आली आहे. कारण, आपल्याकडे 175 ग्राहक बसतील इतके मोठे रेस्टॉरंट आहे. एकूण 43 जणांचा स्टाफ आहे. रेस्टॉरंट बंद ठेवले तरी कर्मचारी बाहेरच्या गावांतून, राज्यांतून आलेले आहेत. त्यांचे पगार, त्यांना जेवण द्यावे लागणार आहे. आता त्यांचे जेवण चुलीवर बनविण्याची वेळ आली आहे.**
>
> **- योगेश झेंडे, संचालक, वीणा व्हेज, हडपसर**

# बारामती पोटनिवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

## विशेष संक्षिप्त पुनरीक्षणानंतर अंतिम मतदार यादी जाहीर; एकूण मतदारसंख्या 3.83 लाख


**पुणे | प्रतिनिधी**

बारामती (२०१) विधानसभा मतदारसंघाच्या आगामी पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने १ जानेवारी २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण करून अंतिम मतदार यादी १० मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या अंतिम यादीनुसार मतदारसंघातील एकूण मतदारांची संख्या ३ लाख ८३ हजार ७६७ इतकी झाली आहे. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्या दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या पत्रानुसार बारामती विधानसभा मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. त्यानुसार ९ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर ९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात आल्या. प्राप्त अर्जांची छाननी करून आवश्यक ती दुरुस्ती केल्यानंतर अंतिम मतदार यादी १० मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

अंतिम मतदार यादीत पुरुष मतदारांची संख्या १ लाख ९३ हजार ४९६, महिला मतदारांची संख्या १ लाख ९० हजार २७१, तर इतर मतदारांची संख्या २४ असून एकूण मतदारसंख्या ३ लाख ८३ हजार ७६७ इतकी आहे.

यापूर्वी २० ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध झालेल्या मतदार यादीत एकूण मतदारसंख्या ३ लाख ६० हजार ६०८ इतकी होती. त्यानंतर ९ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत एकूण मतदारसंख्या ३ लाख ८८ हजार ३७१ इतकी नोंदविण्यात आली होती.



### मतदारसंख्येत वाढ

**» बारामती (२०१) विधानसभा मतदारसंघाच्या अंतिम मतदार यादीत एकूण मतदारसंख्या ३ लाख ८३ हजार ७६७ इतकी नोंदविण्यात आली आहे. त्यामध्ये १ लाख ९३ हजार ४९६ पुरुष, १ लाख ९० हजार २७१ महिला आणि २४ इतर मतदारांचा समावेश आहे. यापूर्वी २० ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध झालेल्या मतदार यादीत एकूण मतदारसंख्या ३ लाख ६० हजार ६०८ इतकी होती. त्यानंतर विशेष संक्षिप्त पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान नवीन मतदारांची नोंदणी आणि आवश्यक दुरुस्तीनंतर मतदारसंख्येत वाढ झाली आहे. ही अंतिम मतदार यादी नागरिक आणि राजकीय पक्षांसाठी पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

सदर अंतिम मतदार यादी सर्व नागरिक व राजकीय पक्षांसाठी पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात आली असून यासंदर्भात लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० मधील तरतुदीनुसार अपील करण्याची तरतूद आहे. संबंधित अपील जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्याकडे १५ दिवसांच्या आत दाखल करता येईल, अशी माहिती उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी दिली.